# जतन करण्यासाठी आशीर्वाद

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

*‘मंदिरात राहा’ सत्संग*
*शनिवार, २५ जुलै, २०२०*

जेव्हा तुम्ही वर पाहता, तेव्हा तुम्हाला काय दिसते?

जेव्हा तुम्ही खाली पाहता, तेव्हा तुम्हाला काय दिसते?

जेव्हा तुम्ही सभोवताली पाहता, तेव्हा तुम्हाला काय दिसते?

या सृष्टीची अद्‌भुतता पाहण्यासाठी
तुम्हाला स्वतःला अशा स्थानी ठेवावे लागेल
जिथे सर्वकाही पारदर्शक आहे
आणि त्या चिदाकाशाला
देवलोकाचे सौंदर्य प्रतिबिंबित करू द्यावे लागेल.

अंतरी तुम्हाला
जर पोकळी दिसली,
तर तिला तुमच्या प्रज्ञानाच्या दीप्तीने भरून टाका.

तुमच्या हृदयात जर तुम्हाला
रितेपणा जाणवला,
तर त्याला तुमच्या स्मृतींच्या मधुर गीतांनी भरून टाका.

तुमच्या मनाला
आणखी एका महान दिवसामध्ये निहित असलेल्या

अनंत संभावनांसाठी खुले ठेवा
जो तुमच्या पदार्पणाची प्रतीक्षा करतो आहे.

तुमच्या हृदयाला आधीपेक्षा अधिक मजबूत ठेवा,
हे जाणा की, ज्या साहसी कार्यासाठी तुम्ही निघाला आहात
ते करण्यापासून कोणतीही गोष्ट तुम्हाला रोखू शकत नाही.

पृथ्वी शांतीमय आणि पोषणकर्ती आहे.

जल निर्मळ आणि नवचैतन्याचा संचार करणारे आहे.

अग्नी तेजोमय आणि शुद्धिकारक आहे.

वायु प्रशांत आणि बलवर्धक आहे.

आकाश विस्तीर्ण आणि रहस्यमय आहे.

या रूपातील तुमचे अस्तित्व,
याच मूलभूत पंचतत्त्वांनी बनलेले आहे,
ते भगवंताने तुम्हाला दिलेला अद्‌भुत उपहार आहे.
तेव्हा, काळजीपूर्वक त्याची देखभाल करण्याचे स्मरण ठेवा.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.